# श्री.अजयकुमार नष्टे,उपविभागीय अधिकारी, जत उपविभाग जत यांचे न्यायालयात....

दुरध्वनी क्रं. 02344/246134 Email-sdojath5@gmail.com

क्र.आरटीएस/अपील/८२/२०२३
दिनांक - २४.०२.२०२५

**प्रति,**

१. हणमंत हुल्याप्पा मचंद
रा.कोंतेवबोबलाद, ता.जत जि.सांगली .... **अपिलार्थी**

**विरुध्द**

१. जानकाबाई हरीश्चंद्र कांबळे
रा. इनामधामणी ता.मिरज जि.सांगली ----- **जाबदार**

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ प्रमाणे**

**निकालपत्र.**

**वादमिळकतीचा तपशिल.**

| गांव | तालुका | गट नंबर | एकूण क्षेत्र | पैकी वादाचे क्षेत्र | वादाचा फेरफार |
|---|---|---|---|---|---|
| कोंतेबोबलाद | जत | ६१७ | ०० हे. ९४ आर. | संपूर्ण | ४२२६ |

मौजे. कोंतेबोबलाद, ता. जत, जि. सांगली येथील गट नंबर ६१७ या मिळकती संदर्भात मंडळ अधिकारी, तिकोंडी यांनी फेरफार नंबर ४२२६, प्रकरणी दिले आदेशावर व्यथित होऊन प्रस्तुत अपिलार्थी यांनी या न्यायालयात सदरचे आरटीएस अपिल दाखल केलेले आहे.

प्रस्तुत अपील कामी उभय पक्षकार यांना म्हणणे मांडणेसाठी रितसर नोटीसा देऊन सुनावणीसाठी पुरेशी संधी देण्यात आली.

**अपिलार्थी यांचे लेखी युक्तीवादामधील सारांशरूपाने पुढीलप्रमाणे मुद्दे मांडले आहेत.**

१. वाद मिळकतीच्या तपशिल यामध्ये सविस्तर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये सोबतच्या हातनकाशात दर्शविल्या प्रमाणे मंचद घराण्याचे ज्ञात मुळ पुरूष म्हणजेच हुल्याप्पा मंचद यांनी आपल्या हयातीत म्हणजेच सन १९६० पुर्वी आपल्या मुलांच्यामध्ये मिळकतीच्या वहिवाटीवरून आपसात तंटा बखेडा होवू नये म्हणून हातनकाशात दर्शविल्या प्रमाणे चारीही बंधूंना प्रत्येकी ० हे २३.५ आर इतक्या क्षेत्राची पट्टी वहिवाटीसाठी बहाल केली. त्यानुसार चारीही बंधू हातनकाशात दर्शविल्या प्रमाणे आपआपल्या पट्ट्यांमध्ये स्वतंत्र वहिवाट करीत आलेले आहेत

२. अपिलार्थी यांचे दोन बंधू १) सौदाप्पा व २) शेटयाप्पा हे मयत असून त्यांना बायकामुले असल्याने त्यांच्या त्यांच्या शाखेस बहाल करण्यात आलेले क्षेत्र २३.५ आर इतके होते. सदरचे क्षेत्र त्यांच्या पुढील वारसांच्या ताब्यात व वहिवाटीत असलेने त्याबाबत अपिलार्थी यांचा कोणताही प्रत्यवाय करणेचा नाही.

३. अपिलार्थी यांचे आणखी एक अविवाहित बंधू श्री. दऱ्याप्पा हे ता.१६.६.२००४ रोजी आपले कोंतेवबोबलात या राहात्या गावी वार्धक्याने मयत झाले. त्यांना पुत्र संतान अथवा बायकामुले नव्हती. इतकेच नव्हेतर ते हयात असताना त्यांच्या वहिवाटीस बहाल करण्यात आलेले व हातनकाशात दर्शविल्या प्रमाणे हे २३.५ आर हे क्षेत्र अपिलार्थी व अपिलार्थी यांची मुले यांच्याकडे कित्येक वर्षापुर्वी वहिवाटीसाठी यातील जायदार हिचा मंचद घराण्याची कुठल्याही प्रकारे दुरान्वये संबंध नव्हता व नाही. तसेच त्यांचा मयत दऱ्याप्पा यांच्याशी देखील कसलेही नातेसंबंध नव्हते व नाही. मुळात दऱ्यापा हा अखेरपर्यंत अविवाहित होता. त्याचे लग्न झालेले नव्हते, त्यामुळे त्यांना बायकामुले असण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. असे असताना देखील जाबदार हिने ती स्वतः सांगली

येथे राहात असताना आपल्या नांवाची दऱ्याच्या यांचे वारस म्हणून नोंद कशी काय करून घेतली, हे गौडबंगाल आजअखेर अपिलार्थी यांना समजू शकलेले नाही. त्यामुळे जाबदार हिची वारस म्हणून झालेली नोंद रद्द होणे क्रमप्राप्त आहे

४. अपिलार्थी यांचे मयत दोन बंधू १) सैदाप्पा व २) शेटयाप्पा हे मयत असून त्यांचे वारसांची स्वतंत्र वहिवाट सुखेनैव त्यांच्या त्यांच्या क्षेत्रामध्ये हातनकाशात दर्शविल्या प्रमाणे असल्याने व अविवाहित मयत दऱ्याप्पा हे अविवाहित मयत झाले असल्याने व त्यांना पुत्र संतान व बायकामुले नसल्याने त्यांच्या वहिवाटीत असलेल्या क्षेत्राचा वारसा हा हिंदू वारसा कायद्यानुसार दऱ्याप्पा यांच्या हयात बंधूस म्हणजेच अपिलार्थी यांनाच त्यांच्या हिश्याची संपूर्ण मिळकत प्राप्त होते व त्यांच्याच नांवचा वारसा होतो. त्यामुळे अपेलंटयांच्या अन्य दोन मयत व विवाहित बंधूंना अथवा त्यांच्या वारसांना दऱ्याप्पा यांचा वहिवाटीत असलेला हिस्सा वारसाना मिळू शकत नसल्याने त्यांना या अपीलाचेकामी सामिल पक्षकार केलेले नाही व तसे करण्याची गरजही नाही.

**जाबदार यांनी त्यांचे लेखी युक्तीवादामधील सारांशरूपाने पुढीलप्रमाणे मुद्दे मांडले आहेत.**

१. अपिलार्थी यांचे अपिल व विलंब माफीचा अर्ज प्रस्तुत जाबदार यांना मान्य व कबुल नाही.

२. सदर म्हणणेच्या कामी घेतलेल्या तक्रारी या एकमेकांस बाध न येता वैकल्पिकरित्या घेतलेल्या आहेत. सदर म्हणणेच्या कामी अपिल व विलंब माफीचे अर्जातील जी जी विधाने प्रस्तुतजाबदार यांनी स्पष्टपणे नाकारलेली नाहीत ती ती विधाने प्रस्तुत जाबदार यांना मान्य आहेत असे नसून सदर परिच्छेदव्दारे सर्व विधांनाचा स्पष्ट इन्कार प्रस्तुत जाबदार करतात. अपिलातील प्रत्येक विधानांच्या शाबितीची जबाबदारी अपिलार्थीवर आहे.

३. अपिलार्थी अपिल कायद्याने चालणेस पात्र नाही. सदर अपिलास नॉन जॉईंडर ऑफ नेसेसरी पार्टीज या तत्वाची बाधा येते. अपिलार्थी यांनी हेतुपुर्वक हुल्ल्याप्पा यांच्या सर्व वारसांना जाबदार म्हणून सामिल केलेले नाही. सदर वारसांना सामिल केल्याशिवाय अपिल चालणेस पात्र नाही

४. अपिलसोबत दाखल केलेला हातनकाशा हा चुकीचा, बनावट, बेकायदेशीर आहे. सबब, सदर नकाशा प्रस्तुत जाबदार यांना मान्य व कबुल नाही. नमुद वंशावळ ही चुकीची व अपुरी आहे. मयत सैदाप्पा, मयत द-याप्पा, मयत शेटयाप्पा, मयत चंद्रव्वा, मयत तिपव्वा यांचे वारस याकामी न दाखवता दिलेली वंशावळ चुकीची व बेकायदेशीर आहे. सदर मयत वारसांची नांवे व पत्ते अपिलार्थी ज्ञात आहेत.

५. वस्तुतः प्रस्तुत जाबदार ही द-याप्पाची मुलगी आहे व याबाबतचे कथन हेतुपुर्वक अपिलार्थी नी केलेले नाही. जाबदार हिचा कायदेशीर हिस्सा नष्ट व्हावा या हेतुने व लबाडीने द-याप्पाला वारस नाही, संतान नाही असे खोटे कथन केलेले आहे. अपिलार्थी व्यतिरिक्त अन्य सदर कुटुंबातील व्यक्ती यांना जाबदार ही द-याप्पाची मुलगी आहे हे ज्ञात आहे व त्यानुषंगाने पुरावा कोर्टासमोर देणेस सदर वारसदार तयार आहेत. अपिलार्थी हिचे लग्नानंतरचे नांव जानकाबाई हरिश्चंद्र कांबळे असे झाले. लग्नापूर्वी तिचे नांव जानकाबाई द-याप्पा मंचद असेच होते. परिच्छेद ५ व ६ मधील संपुर्ण मजकूर खोटा व लबाडीचा आहे. सदर परिच्छेदमध्ये अपिलार्थी व त्यांचे बंधु द-याप्पा यांनी फार पुर्वीच कौटुंबिक व्यवस्थेनुसार द-याप्पा यांचा हिस्सा अपेलंट व त्यांच्या मुलांना प्रत्यक्षात दिला असलेचे व त्या घटनेसही २५ ते ३० वर्षे कालावधी लोटला असलेचे केले कथन खोटे व लबाडीचे आहे. तसेच मयत द-याप्पा यांच्या हिस्सेची पट्टी वारस हक्काने अपिलार्थी यांनाच प्राप्त होते व वारस नात्याने अपिलार्थी यांना ती प्राप्त झाली आहे असे केले कथन बेकायदेशीरपणाचे आहे. तसेच सदर परिच्छेदमध्ये जाबदार हिने मयत द-याप्पा यांची मुलगी या नात्याने वारस म्हणून नोंद होणेसाठी अर्ज केला होता हे केले कथन बरोबर आहे. तथापि, संबंधित अधिका-यांनी शहानिशा न करता सरपंच व पोलिस पाटील व अन्य लोकांशी अपवित्र युती करून,

जाबदार हिचा मंचद घराण्याशी संबंध नसताना वारस नोंद केलेचे केले कथन खोटे व लबाडीचे आहे.

**अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपिलकामी दाखल केलेला अपिल मेमो, प्रकरणांतील उपलब्ध कागदपत्रे यांचे एकत्रीत अवलोकन करता माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.**

१. मौजे. कोंतेवबोबलाद, ता. जत, जि. सांगली येथील गट नंबर ६१७ या मिळकती संदर्भात मंडळ अधिकारी, तिकोंडी यांनी फेरफार नंबर ४२२६, प्रकरणी दिले आदेशावर व्यथित होऊन प्रस्तुत अपिलार्थी यांनी या न्यायालयात सदरचे आरटीएस अपिल दाखल केलेले आहे. या न्यायालयाकडील क्र.आरटीएस/अपील/८२/२०२३, दिनांक २९.०५.२०२४ अन्वये प्रकरणी झालेला विलंब माफ करणेत आलेला आहे.

२. वादातीत फेरफार क्र.४२२६ ने मयत द-याप्पा हुल्ल्याप्पा मचंद यांचे वारस म्हणून जनकाबाई हरिश्चंद्र कांबळे हिचे नाव दाखल केले आहे. अपिलार्थी यांचे मते सदर मयत इसम दिनांक १६.०६.२००८ रोजी अविवाहीत मयत झाले आहेत. तथापि त्याअनुषंगाने कोणाही कायदेशीर पुरावा अपिलार्थी यांनी सादर केलेला नाही. त्यामुळे अपिलार्थी यांच्या कथनात तथ्य असलेचे दिसून येत नाही.

३. अपिलार्थी यांनी मयत द-याप्पा यांस एकमेव वारस म्हणून अपिलार्थी यांचे नाव दाखल करणेची विनंती करीत आहेत. तथापि हिंदू वारसा कायदयातील तरतूदीचा विचारात घेता अपिलार्थी मागणी ही कायदेशीर ठरत नाही. अपिलार्थी यांनी त्यांचे अपील अर्जामध्ये जी मागणी केलेली आहे. त्याचे समर्थनार्थ कोणतेही पुरावे सादर न केलेने मंडळ अधिकारी यांनी वादातीत फेरफार प्रकरणी दिलेल्या निर्णयामध्ये कोणताही फेरबदल करणेची आवश्यकता दिसून येत नाही. यास्तव मी,अजयकुमार नष्टे, उपविभागीय अधिकारी जत, उपविभाग जत पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

**निकालपत्रात नमूद कारणास्तव अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येत आहे.**

खर्चासंबंधी कोणतेही आदेश नाहीत.

सदर आदेशाची अंमलबजावणी अपील कालावधी नंतर करणेत यावी.

सदर निकालाची समज सर्व संबंधीताना देणेत यावी.

प्रस्तुत निकालपत्र www.eqjcourts.gov.inया वेबसाईटवर पहाणेस उपलब्ध आहे.

(अजयकुमार नष्टे)
**उपविभागीय अधिकारी**
**जत उपविभाग जत**

ठिकाण - जत
दिनांक -२४.०२.२०२५

प्रत- अपर तहसिलदार संख यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी रवाना.